म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ना. वा.
दा. क्र. २५२८

2452

# तीन र[illegible]

लेखक
भा. के. [illegible]

IRBK-0102528
IRBK-0102528

ग्रं. सं. ठाणे

# तीन रणयोद्धे

नं. प्र. से
विषय
वा. नं.

IRBK-0102528

नवभारत प्रकाशन संस्था

दा. क्र. २५२८

<u>हें पुस्तक सरकारनें प्राथमिक शाळांतील लायब्ऱ्यांसाठीं मंजूर केलें आहे.</u>

बाल-वाङ्मयमाला २१

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. २५२८ नों. दि ..........
वि. [illegible] ... क्र. ........ .........

ऐतिहासिक वीरकथा

# तीन रणयोद्धे

( बाजी प्रभू, मुरारबाजी, कान्होजी आंग्रे )

: लेखक :

भा. के. काटदरे

किंमत ६ आणे.

म. ग्रं. स. ठाणे.
२५२८

: प्रकाशक :

नवभारत प्रकाशन संस्था मुंबई, ४.

: प्रकाशक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन संस्था,–मुंबई ४.

चित्रकार—व्ही. आर. बाम

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति जून १९४२
पुनर्मुद्रण जून १९४३
पुनर्मुद्रण जुलै १९४६

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी गिरगांव, मुंबई नं. ४

# १. पावन खिंडींतला रणयोद्धा

काय म्हणतां, आतां तुम्हीं मोठे झालां ? तुम्हांला आतां काल्पित परीकथा ऐकायला नकोत ? खऱ्याखुऱ्या ऐतिहासिक गोष्टी ऐकायला पाहिजेत ?

बरें आहे ! ऐका तर !

ऐका ! पण लक्ष्य देऊन ऐका बरें का ! नाहीं तर तो यदुकाकांचा बाळू गोष्ट ऐकतांना बेटा डुलक्याच खात असतो ! आणि वासुअण्णांचा सदू गोष्ट चालूं असतांना भोंवऱ्यांनीं खेळत असतो ! हे असले प्रकार नाहींत उपयोगी ! मी नाहीं अशानें गोष्टी सांगणार. ऐतिहासिक गोष्टी म्हणजे चातुर्मास्यांतलें पुराण नव्हे. त्या श्रवण करण्याच्या निमित्तानें नुसतें उपस्थित राहून पुण्यप्राप्ति होणार नाहीं ! त्या लक्ष्यपूर्वक ऐकल्या पाहिजेत आणि त्यांचें नीट मनन केलें पाहिजे. तरच त्यांपासून लाभ होईल.

ज्याच्या वृत्तान्तानें महाराष्ट्राच्या इतिहासाचें एकच पान—पण तें सोन्याच्या अक्षरांनीं मंडित झालें आहे, त्याची ही गोष्ट आहे; ज्यानें बेदरकारपणें समरांगणांत प्रवेश करून राष्ट्रस्वातंत्र्याविषयींचें आपलें कर्तव्य पार पाडण्यांत प्राणांचीहि परवा केली नाहीं त्या कर्तव्य-वीराचें हें यशोवर्णन आहे. ऐका ! ऐतिहासिक गोष्टी ऐकण्याविषयीं उत्सुक असलेल्यांनो ! लक्ष्य देऊन ऐका !

मध्यरात्रींची वेळ, सर्व विजापुर शहर त्यावेळीं निद्रेच्या स्वाधीन झालेलें होतें. सर्वत्र सामसूम होतें. नाहीं म्हणायला आर किल्ल्याच्या बुरजांवरील पहारेकरी एकमेकांना हांका मारून मधून मधून शांततेचा भंग करीत होते. अशा वेळीं अफजुल-खानाच्या वाड्यांत वेगळाच प्रकार चाललेला होता.

अफजुलखान मारला गेल्याला या वेळीं सुमारें सहा महिने झाले होते; तरी विजापुर दरबाराकडून शिवाजी महाराजांच्या पारिपत्याविषयीं अजुन कसून प्रयत्न करण्यांत आलेला नव्हता. यामुळें अफजुल-



खानाचा पुत्र फाजल महंमद हा आदिलशहा आणि त्याची आई बडी साहेबीण यांच्यावर संतापून गेलेला होता. त्याला कित्येक दिवसांत स्वस्थपणें झोंप देखील आलेली नव्हती. छताला लटकलेल्या मौल्यवान् झुंबरा-पैकीं एकच झुंबर मंदपणें तेवत ठेवून आपल्या महालांत फाजल महंमद रोजच्याप्रमाणें आजहि पलंगावर पडला; पण अंमळ डोळा लागला नाहीं तोंच त्याच्या बापाची—अफजुलखानाची—स्वारी इंगळ्या-सारखे लाल डोळे करून आपणाकडे पहात आहे असें त्याला स्वप्न पडूं लागलें !

स्वप्नांतला अफजुलखान त्याला क्रोधपूर्ण स्वरानें म्हणाला, " बेशरम पोरा ! अजुन तूं मऊ गादीवर लोळत पडून मौजाच मारीत बसला आहेस काय ? धिक्कार असो तुला ! "

अशा प्रकारचें स्वप्न पाहून फाजल महंमदाच्या झोपेचें खोबरें झालें असल्यास नवल काय ? तो " सूड ! सूड ! ! " म्हणत ताड्कन् बिछान्यावरून उठला नि नंगी समशेर हातांत घेऊन आंगांत भूतसंचार झालेल्या

माणसासारखा धावूं लागला ! बन्द असलेले दरवाजे खाड्खाड् उघडून त्यानें वाड्याबाहेर धांव घेतली, आणि ठिकठिकाणच्या पहारेकऱ्यांना आश्चर्यचकित करीत स्वारी वेशीच्या दरवाजाजवळ आली !

"खानसाहेब !" वेशीवरील पहारेकऱ्यांचा मुख्य पुढें होऊन त्याला मोठ्यानें म्हणाला, "एवढ्या रात्रीचे आपण इकडे कोणीकडे ?"

"काय ? तुला तो काफर येथून पळून जात असलेला दिसला नाहीं ?" फाजल महंमदानें त्याला प्रश्न केला.

"काफर ! कुठला काफर ?" पहारेकऱ्यांचा मुख्य म्हणाला, "सद्धर्माच्या एकनिष्ठ बंधांनादेखील या वेळीं इकडे फिरण्याची बंदी आहे ! मग काफर इकडे कोठून येणार ?"

"ज्यानें दग्यानें माझ्या वडिलांचा प्राण घेतला तो काफर !" फाजल महंमदानें म्हटलें; "नाहीं तो तुला इकडून पळत जातांना दिसला ?"

"शहाजी राजांचा तो बंडखोर छोकरा म्हणतां

होय तुम्हीं ?" पहारेकऱ्यांचा मुख्य बोलला, "त्याची या संगीन आर किल्लयाच्या आंत फिरकण्याची काय छाती लागली आहे ? कळकी-करवंदींच्या जाळ्यांआड लपून त्यानें पुंडाई करावी ! मला वाटतें आपणाला तो केवळ स्वप्नांतच दिसलेला असावा !"

"असेल ! तूं म्हणतोस तसेंच असेल !" फाजल महंमद शुद्धीवर येऊन आणि स्वतःला सांवरून घेण्याच्या उद्देशानें म्हणाला, "पण हा काफर पुन्हां मला स्वप्नांत दिसो वा न दिसो, मी म्हणून आतां त्याचा पिच्छा सोडणार नाहीं ! उद्यांच्या दरबारांत त्याच्या प्रकरणासंबंधींचा निकाल मी लावून घेणार ! विजयनगरच्या काफराचें हुसेन निजामशहानें जसें अहमदनगरच्या वेशीवर मस्तक आणून लावलें तसें शहाजीच्या पुंड पोराचें विजापुरच्या या वेशीवर मी मस्तक कधीं आणून लावीन असें मला झालें आहे ! त्यामुळें मला धड झोंपदेखील येत नाहीं ! असो. जातों तर आतां ! या वेळीं मी इकडे आल्याचें तुम्हीं कोणी लोकांजवळ बोलूं मात्र नका ! बरें का ?"

असें म्हणून स्वारी वाड्यांत येऊन पुन्हा बिछान्यावर पडली !

दुसऱ्या दिवशीं दरबार भरला तेव्हां फाजलखानें शिवाजी महाराजांच्या पारिपत्याविषयींचा प्रश्न पुढें आणला. दरबाराकडून होत असलेल्या दिरंगाईचा निषेध करूनच तो थांबला नाहीं, तर अल्ली आदिलशहालाही त्यानें दुर्बल मनाचा म्हणून दोष दिला ! पुढें दरबारांत या प्रश्नाची भवति न भवति होऊन शेवटीं असें ठरलें कीं, शिद्दी जौहर नामक सरदारानें शिवाजी महाराजांच्या पारिपत्याला जावें आणि त्याच्या मदतीला फाजल महंमद व सर्जाखान या दोन सरदारांना द्यावें.

याप्रमाणें बेत ठरल्यानंतर कांहीं दिवसांनीं हे तिन्ही सरदार बरोबर जंगी फौज घेऊन निघाले.

हेरांनीं ही बातमी शिवाजी महाराजांना सांगतांच महाराजांनीं आपल्या लष्कराच्या निरनिराळ्या टोळ्या करून त्या ठिकाठिकाणीं ठेवून दिल्या, आणि बरोबर भरपूर फौज घेऊन व सामुग्री घेऊन स्वतः आपण पन्हाळ्यावर जाऊन राहिले.

शिद्दी जौहरला हें कळतांच तो इतर मुलूख काबीज करण्याचें सोडून देऊन नेमका पन्हाळ्याकडे वळला आणि त्या किल्ल्याला वेढा देऊन बसला.

शिवाजी महाराजांचे जवळपास जे शत्रु होते त्यांना समजलें कीं हिंदुपदपातशाहीची उभारणी करण्याची भाषा अभिमानपूर्वक बोलणारा शिवाजी पन्हाळा किल्ल्यांत कोंडला गेला आहे ! त्याबरोबर तेही उठले आणि महाराजांचा मुलूख सांपडेल तेवढा हाताखालीं घालूं लागले !

शिद्दी जौहर, फाजल महंमद आणि सर्जाखान यांनीं पन्हाळा सर करण्यासाठीं त्याच्यावर हल्ल्यांमागून हल्ले चढविले, परंतु पन्हाळ्यानें त्यांना दाद दिली नाहीं. जो जो हल्ला विजापुरी सरदारांनीं पन्हाळ्यावर चढवावा, तो तो पन्हाळ्यांतील लोकांनीं शर्थीनें परतवून लावावा. असें अनेकदां झालें. तथापि शिद्दी जाहर पन्हाळ्याचा वेढा उठविण्यास तयार होईना. आंतील लोकांची उपासमार करून आपण किल्ला सर करूं अशी त्याला उमेद होती.

पन्हाळा किल्ला आपल्याला वाटत होता तितका मजबूत नाहीं असें महाराजांना लवकरच आढळून आलें. शिवाय आंत अडकून पडल्यामुळें त्यांना बाहेरच्या खबराहि मिळेनाशा झाल्या होत्या. म्हणून त्यांनीं आपण होऊन शिद्दी जौहरशीं तहाचें बोलणें लावलें.

शिवाजी महाराजांकडून तहाची भाषा सुरू होतांच शिद्दी जौहर गर्वानें फुगून गेला!

"तो काफर तह करण्यासाठीं येथें येतांच त्याला पहिला वार मी करीन!" फाजल महंमद आपली तलवार परजीत म्हणाला!

तह होणार ही बातमी सर्व लष्करांत हां हां म्हणतां पसरली? लढाईला कंटाळलेल्या शिपाई लोकांनीं लगेच आपला लष्करी सरंजाम उतरला. त्यांच्यांत आनंदी आनंद पसरला. गस्त घालण्याचें त्यांनीं सोडून दिलें. तहनाम्यावर दुसऱ्या दिवशीं सह्या होणार असें समजून विजापुरी फौज रात्रीं स्वस्थपणें झोपीं गेली?

शिवाजी महाराजांनीं ती संधि साधून रात्रीच्या वेळीं विजापुरकरांचा सबंध एक पहारा झोंपलेला असतांनाच कापून काढला आणि शत्रुसैन्यांतून अशा रीतीनें वाट काढून ते बरोबरच्या एक हजार लोकांसह विशाळगडाकडे निघाले

शत्रु आपल्या हातावर तुरी देऊन गेला हें विजापुरकरांना लवकरच कळून आलें. त्याबरोबर त्यांनीं चंद्रज्योतींच्या प्रकाशांत तमाम मोर्चे उठवून जिकडे तिकडे शोध चालविला पण पळणारा पळतो एका वाटेनें, आणि शोधणारा शोधतो बारा वाटा, अशांतलीच त्यांची गत झाली; आणि त्यामुळें त्यांचा बराच वेळ व्यर्थ जाऊन महाराजांना तितके दूर निघून जाण्याला अवकाश मिळाला.

सकाळीं सूर्योदयाच्या सुमारास महाराज एक डोंगर चढून जात असतां विजापुरकरांच्या दृष्टीस पडले. त्यावेळीं महाराजांचे लोक आणि विजापुरकर यांच्यामध्यें पुरें पांच कोसदेखील अंतर नव्हतें. तेव्हां आतां महाराजांचा वेगानें पाठलाग करून त्यांना

लंबे करतां येणें शक्य आहे असें पाहून फाजल महंमदानें आपल्या स्वारांना भरधांव घोडे सोडून शत्रूचा पाठलाग करण्यास हुकूम दिला. फाजल महंमदाच्या बरोबर शिद्दी जौहारचा पुत्र शिद्दी अजीज हा होता. त्यानेंहि आपल्या लोकांना हुकूम करून फाजलखांबरोबरच पाठलागाला सुरवात केली !

फाजलखांनें सुरू केलेल्या ह्या पाठलागावर अखिल महाराष्ट्राची भवितव्यता अवलंबून होती. शत्रूला दूर राखून शिवाजीमहाराज जर विशाळगड गांठते तर स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं महाराष्ट्रानें चालविलेला उद्योग यशस्वी होण्याच्या मार्गाला लागला असता. पण शिवाजी महाराज आणि त्यांच्या बरोबरचे दमलेले भागलेले लोक यांना फाजलखांनें जर गांठलें असतें तर महाराष्ट्राच्या सर्व उद्योगाची तेथेंच इतिश्री होण्याचें भय होतें.

शिवाजी महाराजांबरोबर यावेळीं बाजीप्रभु देशपांडे हिरडस मावळकर हा होता. पन्हाळ्याला वेढा पडला असतां विजापुरकरांवर रात्रीं बेरात्रीं अचानक छापे

घालून नि वेळोवेळीं त्यांची रसद मारून याच जवानमर्दानें त्यांना अगदीं जर्जर करून सोडलें होतें.

महाराजांवरचा हा बिकट प्रसंग पाहून स्वस्थ बसणारा बाजी देशपांडे हा नव्हता. आपल्या भावी यशाची तलवार कोळ्याच्या जाळ्यांतील धाग्यांवर लटकत ठेवून महाराज व मुसलमान यांच्यामध्यें चाललेली ही बिकट नि चुरशीची शर्यत शांतपणें पहात रहाणें हें त्या बहाद्दराला सहन होईना. त्याच्या कमरपट्ट्याला लटकत असलेली तलवार सर्कन् म्यानांतून बाहेर पडली ! आंगांत वीरश्री संचारली आणि त्याच्या आंगरख्याचे बंद तटतटां तुटले ! अशा स्थितींत तो महाराजांपुढें झाला आणि त्यांना वंदन करून म्हणाला,

" महाराज, आपल्या चरणांपाशीं माझी एक विनंति आहे. ती ही कीं, मी आणि माझ्या हाताखालीं आपण द्याल ते लोक असे पुढल्या पावनखिंडींत शत्रूला अडवून धरतों. शत्रूला आम्ही अडवून धरलें असतां आपणाला सुखरूपपणें विशाळगडास जातां

येईल. आपण विशाळगडावर पोंचतांच भांडीं वाजवावीं. म्हणजे हरप्रयत्न करून आम्हीं आपल्या चरणांपाशीं येऊन हजर होऊं. एवढी ही माझी विनंति आपण मान्य करावीच. नाहीं म्हणूं नये."

बाजीची ही विनंति महाराज प्रथम मान्य करीनात. "आपण सर्व बरोबरच विशाळगडास जाऊं." असें त्यांचें म्हणणें पडलें. पण बाजी अतिशयच गळीं पडला; "पावनाखिंडींत शत्रूला अडवून धरण्याची अनुज्ञा नसेल तर आपल्या पायांशीं शिरच्छेद करून घेऊन मरतों!" असें म्हणूं लागला.

बाजीची निष्ठा पाहून शिवाजीमहाराजांना गहिंवर आला. प्रसंगाकडे लक्ष्य देऊन त्यांनीं त्याची विनंति मान्य केली.

"बाजी!" महाराज म्हणाले, "माझ्या या साडेतीन हात देहाच्या बचावासाठीं नव्हे, तर अंगीकृत कार्याचें महत्त्व आणि त्या कार्याला विघातक असणारा हा प्रस्तुतचा प्रसंग विचारांत घेऊन मी तुमची विनंति मान्य करतों. बरोबरच्या लोकांपकीं

निम्मे लोक घेऊन मी पुढें जातों. तुम्हीं बाकीच्या लोकांना घेऊन पावनखिंडीचा मार्ग अडवून धरा. विशाळगडावर पोंचतांच मी इशारतीच्या पांच तोफा सोडीन. तोंपर्यंत शत्रूला खिंडींतून पलीकडे येऊं देऊं नका. आपलं अंगीकृत कार्य यशस्वी होणें न होणें हें तुमच्याकडून शत्रूला होणाऱ्या विरोधावरच सर्वस्वी अवलंबून आहे हें तुम्हीं जाणतांच. श्रीभवानी तुम्हांला यशस्वी करो ! मी आतां जातों."

असें म्हणून महाराजांनीं बाजीला आलिंगन दिलें आणि विशाळगडास जाण्यासाठीं बरोबरच्या निम्मे लोकांनिशीं ते निघून गेले.

आपण केलेली विनंति महाराजांनीं अमान्य केली नाहीं, हें पाहून बाजी प्रभूला जो आनंद झाला त्याचें वर्णन करतां येणें अशक्य आहे.

बाजी प्रभु देशपांडे ! अहाहा ! हें नांव उच्चारतांच मनामध्यें आदर, प्रेम, अभिमान, वगैरे जे भाव उचंबळून येतात ते किती म्हणून सांगावे ? शिवकालीन महाराष्ट्राचा इतिहास जो इतका उदात्त, इतका उज्ज्वल

आणि रमणीय वाटतो, त्याचें कारण तो बाजी प्रभूसारख्या अनेक कर्तव्यनिष्ठ वीरांनीं निर्माण केलेला आहे, हेंच होय.

आपला प्राण धोक्यांत घालून घेतल्यामुळें वास्तविक पाहतां बाजी प्रभूला चिंता उत्पन्न व्हावी, पण आतां तो अगदीं निश्चिंत झाल्यासारखा दिसूं लागला! महाराष्ट्रभूमीची सौभाग्यश्री आपल्या रक्तानें रंगणार या विचारानें त्याच्या अंतःकरणांत हर्षाच्या उकळ्यावर उकळ्या फुटूं लागल्या!

महाराजांनीं त्याच्या हाताखालीं दिलेले मावळे त्यानें आपल्या भोंवतीं जमविले. उत्तेजक शब्दांनीं त्यांना त्यानें उत्तेजन दिलें. आवेशपर भाषणानें त्यांच्या ठिकाणीं आवेश उत्पन्न केला; पावनखिंडींतील माऱ्यांच्या जागा पाहून तेथें त्यानें शूर तिरंदाज बसविले आणि स्वतः तो पांढऱ्या झऱ्याजवळ ठाणें देऊन शत्रूंची मार्गप्रतीक्षा करीत राहिला.

फार वेळ गेला नाहीं तोंच दूर अंतरावर घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं येऊं लागला.

फाजलखांच्या टोळींतील बिनीचे स्वार अर्धचंद्रयुक्त निशाण फडकवित नि वांकड्या तरवारी सूर्यप्रकाशांत चमकवीत लवकरच खिंडीच्या बारीजवळ आले.

मराठे त्यांच्या स्वागताला तयारच होते. त्यांनीं नेमके बाण सोडून स्वारांचा समाचार घेतला. त्या स्वारांतील अर्धे स्वार बाणांनीं जखमी झाले. त्यांतले कित्येक घोड्यांवरून खालीं पडले व त्यांचे घोडे इतस्ततः उधळले. बाकीचे स्वार मागें पळाले आणि मागून येणाऱ्या स्वारांना म्हणाले, "सैतान मराठे या खिंडींत दबा धरून बसलेले आहेत ! सर्वांनीं सावध असावें. उगीच जलदी करून प्राण गमविण्यांत अर्थ नाहीं !"

पण ते सर्व स्वार पायदळाची वाट पहात राहिले.

कांहीं वेळानें त्यांना पायदळाची कुमक येऊन पोंचली.

खिंड काबीज करण्यासाठीं मुसलमानांनीं मग त्वेषानें हल्ल्यांवर हल्ले चढविण्यास आरंभ केला ! पण प्रत्येक वेळीं त्यांना मराठ्यांच्या हाताचा मारा खाऊनच परत फिरावें लागलें !

उभय पक्षीं पुष्कळ लोक पडले तरी कोणताच पक्ष आपली चिकाटी सोडीना! हातघाई चालू झाली कीं "अल्लाहु अकबर!" आणि "हरहर महादेव!" हे ध्वनि उठत व खिंडींतून त्यांचे प्रतिध्वनि निघत.

बाजी प्रभूला ठिकठिकाणीं जखमा झाल्या होत्या व त्यांतून रक्त वहात होतें. त्याचा पराक्रम पाहून शिद्दी जौहरचा मुलगा अजीज अगदीं थक्क होऊन गेला आणि त्यानें त्याची तारीफ केली.

शिद्दी अजीजनें बाजी प्रभूची केलेली तारीफ फाजलखांला सहन झाली नाहीं. शिद्दी जौहर व त्याचा मुलगा हे मराठ्यांना फितुर असावे नि त्यामुळेंच शिवाजीला पन्हाळ्यावरून निसटून जातां आलें असा फाजलखांला संशय होता तो अजीजनें आतां बाजीची तारीफ केली त्यामुळें दृढ झाला.

"शिद्दीची ही हरामजादी अवलाद शत्रूला फितुर झालेली आहे!" फाजलखां क्रोधानें उसळून म्हणाला, नंतर सैनिकांकडे वळून तो बोलला, "नामर्दांनो! तुम्हांला ही खिंडीतली वाट मोकळी करतां येत नसेल

तर माझ्यामागून चला ! अफजुलखानाचा हा पराक्रमी पुत्र आपल्या अतुल पराक्रमानें खिंडींतली वाट एका क्षणांत मोकळी करतो कीं नाहीं तें पहा ! "

फाजल महंमदानें आपणावर केलेला भयंकर आरोप ऐकून अजीजला संताप आला. त्याचे डोळे लाल झाले. तरवार धारण केलेला उजवा हात फाजलखांचे दोन तुकडे करून टाकण्यासाठीं उत्सुक झाला ! पण ही स्थिति क्षणभरच टिकली. सध्यांचा प्रसंग काय आहे याची अजीजला चांगली जाणीव होती; आणि म्हणून त्यानें मोठ्या कष्टानें आत्मसंयमन केलें.

नंतर खिंडींतली वाट मोकळी करून घेण्यासाठीं सर्व मुसलमान वीरांनीं एक निकराचा प्रयत्न करण्याचें ठरविलें आणि "मौलालीकी यारो दीन ! ! " अशी जंगी आरोळी ठोकून झंझावातासारख्या वेगानें बाजी प्रभूच्या लोकांवर ते धांवून गेले.

निकराची हातघाई सुरू झाली.

विजापुरी फौजेनें आपली शिकस्त केली तरी त्या फौजेला खिंड काबीज करतां आली नाहीं, अगर मी मी

म्हणणारा फाजल महंमद खिंडींतली वाट मोकळी करूं शकला नाहीं ! बाजी प्रभूच्या लोकांपैकीं खालीं पडणाऱ्या प्रत्येक मनुष्याला मागें ओढून मागला मनुष्य त्याची जागा भरून काढीत होता. बाजी प्रभूच्या आंगांतून रक्त फार गेल्यामुळें त्याची शक्ति क्षीण झाली होती; तरी तो आपल्या लोकांना प्रोत्साहन देऊन लढतच होता, विशाळगडावरील तोफांचे आवाज केव्हां होतात इकडे त्याचें लक्ष लागून राहिलें होतें. पण दोन प्रहर होत आले तरी आवाज कानीं पडेनात ! त्याची उभें राहण्याची शक्ति गेली नि तो नाइलाजानें खालीं बसला ! रक्तस्राव एकसारखा होतच होता ! त्याच्या शरीरांतून बाहेर पडणारा प्रत्येक रक्तबिंदु त्याचें थोडें थोडें आयुष्य घेऊन चालला होता ! आतां आपण वांचत नाहीं अशी त्याची खात्रीच होऊन चुकली होती. तोफेचे आवाज ऐकावेत आणि मग प्राण सोडावे एवढ्याच प्रबल इच्छेच्या जोरावर तो जिवंत राहिला होता ! अशा स्थितींत त्याच्या मर्मस्थानीं शत्रूकडील एक बंदुकीची गोळी येऊन

लागली ! झालें ! त्याबरोबर त्या वीराच्या शरीराची तडफड सुरू झाली ! शरीर प्राणधारणाला असमर्थ झालें होतें आणि प्राण तर तोफेचे आवाज ऐकल्याशिवाय शरीराचा त्याग करण्याला अत्यंत नाखुष होते. कुडी आणि प्राण यांची अशी धडपड चाललेली असतांनाच सुदैवानें " धोम्–धोम्–धोम्–धोम्–धोम् ! " असे तोफेचे पांच आवाज ऐकूं आले ! कष्टानें प्राण कंठी धरून राहिलेल्या त्या पावन खिंडींतील रणयोद्ध्याला त्या आवाजांनीं सांगितलें, " वीरा ! शिपाईगिरीची शर्थ केलीस ! आतां अवतार पुरा कर ! तुझा शिवराय सुखरूपपणें विशाळगडास जाऊन पोंचला बरें ! "

तत्क्षणींच समाधानाची छटा बाजीच्या मुखावर चमकली.

" माझें कर्तव्य मी बजावलें ! आतां सुखानें मरतों ! गड्यांनो रामराम ! " तो म्हणाला.

दुसऱ्या क्षणीं त्या ठिकाणीं बाजीचें निष्प्राण कलेवर दिसूं लागलें ! त्यावेळीं भर दुपार झालेली असून तो दिवस २ जुलै सन १६६० हा होता.

पावनखिंडींतील रणयोद्ध्याचें वीरचरित येथें संपलें! आपला राजा संकटमुक्त झाला, आतां खिंड अडवून बसण्याचें कारण नाहीं असें समजून मराठ्यांनीं खिंडीची वाट मोकळी केली नि जातांना बाजीचें शवहि ते बरोबर घेऊन गेले! त्यांनीं तें शिवाजी महाराजांकडे नेलें, तेव्हां महाराजांना अतोनात वाईट वाटलें. आपल्या अश्रूंनीं त्यांनीं त्या कर्तव्यनिष्ठ वीराच्या शवाला स्नान घातलें! आपला आज पुनर्जन्म झाला असें त्यांना वाटलें आणि त्यांनीं तसें बोलूनहि दाखविलें.

---

## २. त्यांनीं काय सांगितलें

इसवी सनाचें १६६५ वें वर्ष, औरंगजेबाचे दिल्लीरखान आणि मिर्झा राजा जयसिंग हे दोन संग्रामनिपुण सरदार या वर्षाच्या आरंभींच महाराष्ट्रावर चाल करून आलेले होते. त्यांच्यापाशीं अफाट फौज नि युद्धोपयोगी असें मुबलक सामान होतें. जयसिंगाकडे सर्व फौजेची मुखत्यारी असल्यामुळें त्यानें सासवड मुक्कामीं येतांच शिवाजी महाराजांच्या पुरंदर किल्ल्याला वेढा देऊन तो काबीज करावा असा दिल्लीरखानाला हुकूम केला. त्या हुकमावरून दिल्लीरखानानें पुरंदरला वेढा दिला. त्या वेळीं एप्रिल महिना चालू होता.

पुरंदर हस्तगत होणें फार बिकट असतांहि खानानें वेढ्याचें काम मोठ्या नेटानें चालविलें होतें. पुरंदर गड काबीज करून नंतर महाराष्ट्रांतील मजबूत किल्ले,

गगनचुंबित पर्वत आणि पाताळास जाऊन पोंचणारीं खोरीं प्रत्यक्ष पहाण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. तो महाराजांना निरोपावर निरोप पाठवीत होता कीं, "अरे तूं लढवय्या म्हणवितोस तर समोर ये ! लपून कशाला बसला आहेस ? तुझी तलवार म्हणजे अख्ख्या दख्खनची ढाल आहे अशी तुझी कीर्ति आम्ही ऐकत आलों ती खरी करून दाखीव ! दख्खनचें ती ढालीप्रमाणें रक्षण कसें करते तें तरी मला पाहूं दे !"

महाराजांनीं त्याच्या या निरोपांकडे विशेष लक्ष्य दिलें नाहीं. त्यांनीं जयसिंगाकडे तहाचें बोलणें लाविलें होतें. आणि जयसिंगाहि तहाला प्रतिकूल नव्हता. दिलेरखानाला हें कळतांच त्याच्या आंगाची नुसती लाही झाली ! हे हिंदु हिंदु एक होऊन जाणार आणि आपण तोंडघशीं पडणार असें त्याला वाटलें. त्यानें जयसिंगाला निरोप पाठविला कीं, शिवाजीबरोबर आपण आपल्या अखत्यारीनें तह न करतां त्याचें म्हणणें काय असेल तें बादशहाला लिहून कळवावें आणि बादशहाकडून हुकूम येईल तसें वागावें असा निरोप पाठवूनच तो स्वस्थ बसला नाहीं. त्याला अशी

घास्ती पडली कीं, शिवाजी जर आपणाला शरण आला तर त्याच्याशीं तह झाला नाहीं तरी युद्ध बंद करावें लागेल; आणि तसें होण्यापूर्वी जर आपल्याला हा पुरंदर गड सर करतां आला नाहीं तर आपल्या शौर्याला तें एक लांछनच होईल. म्हणून त्यानें पुरंदर जेणें करून लवकर सर होईल असा जोराचा प्रयत्न चालविला. पुरंदराच्या जवळचा रुद्रमाळा किल्ला मोंगलांच्या हातीं आला होता. त्यावरून पुरंदरावर तोफांचा मारा करण्याची खटपट खानानें करून पाहिली. पण ती यशस्वी झाली नाहीं. तरी त्यानें धीर सोडला नाहीं. पावसाळ्यांत ज्याप्रमाणें पर्जन्याची वृष्टि होते त्याप्रमाणें तो बहाद्दर गडी तोफांच्या गोळ्यांची वृष्टि पुरंदरावर करीत होता. खानाच्या या कृतीमुळें पुरंदरस्थ मराठी योद्धे क्षुब्ध झाले नि त्यांनीं खानाच्या लष्करावर एकदम हल्ला करण्याचा बेत केला. मुरारबाजी देशपांडे नामक एका वीर पुरुषाच्या ताब्यांत तो किल्ला होता. त्यानें अडीच हातांहून अधिक लांबीची अशी तलवार आपल्या हातांत धारण केली आणि सैनिकांना बाण, तोमूर, भाले व तलवारी वगैरे

आयुधें देऊन त्यांच्यासह मोंगलांवर एकदम चाल केली ! मोंगलांची या अचानक हल्ल्यामुळें तारांबळ उडाली. मराठे आणि मराठ्यांचा पन्नास वर्षांच्या उमरीचा सरदार तो मुरारि यांनीं मोंगलांशीं लगट करून भयंकर लढाई चालविली. रक्ताचे पाट वाहूं लागले. तें पाहून खानाला मोठा त्वेष आला. तो गर्जून म्हणाला, "यार हो ! असे नामर्द कां झालांत ? तुम्हीं कडव्या लोकांचे वंशज आहांत ना ?"

दिल्लीरखान इतकें बोलत आहे तोंच हातांत ढाल तलवार घेतलेला मुरारि सिंहासारख्या उड्या टाकीत पुढें आला नि पळत असलेल्या मोंगल योद्ध्यांस उद्देशून म्हणाला, "लढाईच्या नुसत्या लांब लांब गप्पा झोंकणाऱ्यांनो ! बोलून दाखवितां त्याच्या शतांश तरी पराक्रम तुम्हीं करून दाखवावयाचा होता ! सुरवातीलाच रणांत आम्हांला पाठ दाखवून पळणारे जे तुम्ही, त्या तुम्हांला धिक्कार असो !"

खुद्द खानाच्या भाषणानें जें कार्य झालें नव्हतें, तें कार्य मुरारीच्या भाषणानें झालें !

पुन्हा निकराचा संग्राम चालूं झाला !



शेंकडों वीरांना कंठस्नान घालून मुरारि थेट दिल्लीरखानावर चालून गेला; तेव्हां खानाला त्याच्या शौर्याचें आश्चर्य वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. तो सैन्याच्या अग्रभागीं हत्तीवरील हौद्यांत उभा राहून स्वतः मुरारीबरोबर युद्ध करूं लागला. परस्परांच्या शस्त्रांचे वार लागून ते उभय वीर वसंत ऋतूंत फुललेल्या पळसाप्रमाणें शोभूं लागले.

मुरारीचें युद्धकौशल्य पाहून खान थक्क झाला.

तो मुरारीला म्हणाला, " तूं आम्हांला शरण ये ! आम्ही तुझें कल्याण करूं ! "

मुरारीनें तिरस्कारपूर्ण हंसून उत्तर केलें, " काय ? तुला शरण येऊं म्हणतोस ? आम्हीं एका परमेश्वराला आणि दुसऱ्या आमच्या शिवप्रभूलाच काय ते शरण आहों. इतरांना आम्हीं शरण जात नसतों. इतरांना शरण आणण्याचें काम आम्हीं करीत असतों. "

हें उत्तर ऐकतांच खानानें मुरारीवर एक तीक्ष्ण असा बाण सोडला. तो मुरारीच्या नेमका वक्षस्थळावर लागून तो महावीर खालीं पडला. आणि " शंभो ! पाहि माम् ! " असे शब्द उच्चारून त्यानें प्राण सोडला.

वीराला उचित असेंच मरण मुरारीला आलें. दिल्लीरखानाच्या हर्षाला आतां पारावार नाहींसा झाला. तो आणि त्याचे सैनिक मोठमोठ्यानें जयघोष करीत पुरंदरगडाच्या दरवाजाकडे चालले.

दरवाजाचें रक्षण करणारे वीर त्यांना एकदम आडवे आले व तळहातावर शिर घेऊन त्यांच्याशीं लढूं लागले.

दिल्लीरखानाला वाटत होतें कीं, मराठ्यांचा मुख्य सरदार पडला; तेव्हां मराठे आतां सैरावैरा पळूं लागतील. पण त्याचा हा अंदाज सपशेल चुकला! कोठून आपण या दरवाजाजवळ आलों असें त्याला होऊन गेलें! तरी अंतःकरणांतील चलबिचल बाहेर बिलकुल दिसूं न देतां तो मराठे वीरांना म्हणूं लागला, " तुम्हीं उगीच आतां मृत्युमुखांत कां पडतां? तुमचा मुख्य सरदार युद्धांत ठार झाला!"

मराठ्यांनीं खानाला त्या वेळीं काय उत्तर दिलें असेल असें तुम्हांला वाटतें?

शिवाजी महाराजांच्या पदरीं असलेला पुरुषोत्तम कवी म्हणतोः—

" ते प्राहुरेहि शिवभूपगृहे मुरारी।—
तुल्यास्ततः समधिका इह सान्ति नूनम।"

( त्यांनीं सांगितलें, " ये! शिवाजी महाराजांच्या पदरीं नि येथें मुरारीसारखे, किंबहुना त्याहूनहि कांकणभर सरसच असे वीर कांहीं कमी नाहींत!")

# ३. कान्होजी संकपाळ

हर्णै बंदरच्या उत्तरेस समुद्रांत जो एक किल्ला दिसतो त्याला ‘ जंजिरे सुवर्णदुर्ग ’ असें म्हणतात. किल्ला मोठा असून त्याचा तट उंच आहे, आणि त्याला एक प्रवेशद्वार आहे.

छत्रपति संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत मराठी राज्यावर दिल्लीचा मोंगल बादशहा औरंगजेब यानें जी स्वारी केली ती इतिहासांत प्रसिद्ध आहे. जंजिऱ्याचा हबशी हा त्यावेळीं आपणाला मोंगल बादशाह्याचा ताबेदार म्हणवीत होता. मराठी राज्यावर मोंगलांचें परचक्र आलेलें पाहून मराठ्यांच्या मुलखावर हात मारण्यास ही उत्तम संधि आहे असें हबशाला वाटलें. त्यानें सुवर्णदुर्गाला समुद्राकडून आरमाराचा आणि जमिनीकडून सैन्याचा वेढा देऊन किल्ल्यांतील माणसांना बाहेर पडतां येणें अशक्य करून टाकलें.

किल्ल्यांत लढाईचें सामान आणि लढाऊ लोक यांची कमतरता नव्हती; पाणीहि मुबलक होतें. परंतु धान्याचा संग्रह मात्र पुरेसा नव्हता. हबशाचा बेत तर असा दिसत होता कीं, प्रत्यक्ष लढाई न करतां किल्ल्यांतील लोकांची उपासमार करून त्यांना जेरीस आणावयाचें. त्यामुळें वेढ्याचें काम त्यानें दक्षतेनें चालविलें होतें. किल्ल्याच्या दक्षिण, पश्चिम आणि उत्तर बाजूंकडे त्यानें आपलें आरमार पसरून दिलें होतें. पूर्वेच्या बाजूकडे किनारा थोड्याच अंतरावर असल्यामुळें तेथें आरमार आणणें शक्य नव्हतें. म्हणून ती बाजू रोंखून धरण्यासाठीं हबशाचें लष्कर किनाऱ्यावर तळ देऊन बसलें होतें.

सुवर्णदुर्गास सुभा मोहिते यांचा होता. हबशाची जय्यत तयारी आणि धान्यसामुग्रीचा आपणाकडे तोटा यामुळें किल्लेकरी बेदिल झाला आणि मोहिते यांचीदेखील हिंमत खचली. कौल घेऊन किल्ला हबशाच्या स्वाधीन करावा असें त्यांनीं ठरविलें.

मोहिते यांच्या हाताखालीं कान्होजी, तुकोजी

संकपाळ नांवाचा एक तरुण अधिकारी होता. तो दोनशें शिपायांवरला अंमलदार असून त्याची मोहित्यांच्या हातांखालीं खुद्द छत्रपतींकडून नेमणूक झालेली होती. सुवर्णदुर्गासारखा मजबूत आरमारी किल्ला, त्याच्या बचावाप्रीत्यर्थ एकदेखील घाव न हाणतां निमूटपणें शत्रूच्या स्वाधीन करणें त्याला रुचलें नाहीं. मोहित्यांना त्यानें बजावलें कीं, किल्ला तुमचा आमचा नसून तो खुद्द छत्रपति धन्यांचा आहे. त्याचें शत्रूपासून रक्षण करण्याकरितां छत्रपति धन्यांनीं तुम्हां –आम्हांस येथें ठेवलेलें आहे. तेव्हां प्राणांचेंहि मोल द्यायची वेळ आली तरी तें मोल देऊन किल्ल्याचें शत्रूपासून रक्षण करणें हेंच आपलें कर्तव्य ठरतें. छत्रपति धन्यांच्या आज्ञेवांचून किल्ला शत्रूच्या हवालीं करण्याचा आपणाला अधिकारच नाहीं. शत्रूनें आपणा सर्वांचे मुडदे पाडून किल्ला सर केला तर गोष्ट निराळी; पण तोंपर्यंत किल्ल्यांतल्या निशाणकाठीवरला भगवा फरारा मी खालीं उतरूं देणार नाहीं. तो खालीं उतरून त्याची जागा शत्रूच्या चांदताऱ्याला

द्यायला जे उद्युक्त झालेले आहेत ते सगळे देशद्रोही, धर्मद्रोही आणि राजद्रोही आहेत असा त्यांच्यावर मी उघड आरोप करतों !"

"चूप रहा संकपाळाच्या पोरा !" सुभेदार मोहिते दरडावणीच्या स्वरानें म्हणाले; अरे, तुझा आजा संकोजी संकपाळ नागऱ्या होता; नागऱ्या, समजलास? नागऱ्याच्या नातवाच्या तोंडीं 'देशद्रोह' 'धर्मद्रोह' 'राजद्रोह' असले हे जाडे जाडे शब्द कशाला हवेत? तुझा बाप तुकोजी संकपाळ आऊत सोडून राऊत बनला. तरी पण आपण वास्तविक कोण याची त्याला पक्की जाणीव होती. तो कधीं असा लांब जीभ करून बोलला नाहीं. तूं मात्र आम्हां पिढीजाद सरदारांना उलट गोष्टी सांगूं लागला आहेस! पण जा, एकवार तुला आम्हीं गय करतों ! तू अजून तरुण आहेस. तुझें राजकारण आडदांड आहे. पोक्त राजकारण तुला अजून समजूं लागलेलें नाहीं. पुन्हा जर अशी कधीं लांब जीभ करून बोललास तर मात्र गय होणार नाहीं ! मग अंधार कोठडीच पहावी लागेल ! लक्ष्यांत ठेव !"

" माझी येथील नेमणूक खुद्द छत्रपति धन्यांकडून झालेली आहे. " कान्होजी उत्तरला, " तुमच्या दरडावण्यांना मी भीक घालीत नाहीं ! पोक्त राजकारण म्हणजे भागूबाईसारखें वर्तनच जर असेल तर तें मला कळत नाहीं हेंच चांगलें ! पुन्हा मी तुम्हांला निक्षून सांगतों कीं, किल्ला शत्रूच्या हवालीं करण्याचा तुमचा बेत मी सिद्धीस जाऊं देणार नाहीं ! "

" पकडा रे या हरामखोराला ! " सुभेदारसाहेब ओरडले, " करा याला एकदम चतुर्भुज ! "

एकहि इसम कान्होजीला पकडण्यासाठीं पुढें आला नाहीं !

" आमची हुकमत आजच नाहींशी झाली कीं काय ? " सुभेदारसाहेब चकित होऊन म्हणाले, " सगळे, अगदीं सगळे लोक फितूर झाले अं ? कान्ह्या, तूं शिरजोर, तो शिरजोर, पण आणखीं हें फितुरी करण्याचें कसब कुठें शिकलास बाबा ? अशानें नाहीं रे बाबा तुझें कल्याण व्हायचें ! "

" माझ्या कल्याणाचा यांत प्रश्नच उद्भवत नाहीं."

कान्होजी म्हणाला, " हा मराठी राज्याच्या कल्याणाचा प्रश्न आहे. किल्ल्यांतील शिबंदी आपला जीव बचावून मराठी राज्याचें अकल्याण करावयाला तयार नाहीं ही वास्तविक स्थिति आहे. फितूर कोणीही झालेला नाहीं. "

" आतां येथें राहण्यांत आमची शोभा राहिली नाहीं ! " सुभेदारसाहेब निराशेच्या स्वरांत म्हणाले; नंतर किल्लेदाराकडे वळून ते म्हणतात, " किल्लेदार, चला, आपणच आपले हबशी सरकारच्या स्वाधीन होऊं म्हणजे आमचें बोलणें लबाडीचें नव्हतें इतकी तरी हबशी सरकारची खात्री होईल ! विश्वासघातकी म्हणून आम्हां मराठ्यांचें नांव मुसलमानी दरबारांतून आधींच बद्दू झालेलें आहे ! आम्हांमुळें त्यांत आणखीं नवी भर पडायला नको ! चला, उठा ! "

" मुसलमानी दरबारांत बद्दू झालेलें मराठ्यांचें नांव आपल्या कृतीनें उजळ करण्यासाठीं तुम्ही एकदांच नव्हें तर हजार वेळांदेखील जाल, " कान्होजी म्हणाला, " पण तुमच्यासारख्या नांवउजळ्यांना तिकडे जाऊं देतो कोण ? तिकडे जाऊन शत्रूला तुम्हीं किल्ल्याची

व्यंगेंच सांगणार कीं नाहीं ? हें पाप तुम्हांकडून घेऊं देण्यापेक्षां तुम्हाला एथें अटकेंत ठेवणेंच चांगलें. सुभेदारसाहेब, किल्लेदारसाहेब, छत्रपतीच्या गादीचा सेवक – हा कान्होजी, छत्रपतींनीं स्थापिलेल्या स्वराज्याच्या कल्याणासाठीं तुम्हाला अटक करीत आहे. तरी बऱ्या बोलानें स्वाधीन व्हा !"

"होतों बाबा !" सुभेदारसाहेब खिन्नवदन होऊन बोलले, "आज काल खऱ्याची दुनयाच राहिली नाहीं ! आमच्या वेळीं असें नव्हतें !"

कान्होजीनें त्या दोघांना एका वाडयांत बंदोबस्तानें ठेविलें आणि सर्व अधिकार आपल्या हातीं घेतला. जरूरीपुरते लोक त्यानें किल्ल्यांत ठेविले आणि बाकीच्यांना बरोबर घेऊन तो किल्ल्याबाहेर पडला. किल्ला आणि किनारा यांमधील उथळ समुद्रांत मोठमोठे धोंडे टाकून एक दगडी सेतु केलेला होता. त्यावरून तो किनाऱ्यावर आला आणि हबशांच्या लष्करावर त्यानें हल्ला केला.

मराठ्यांना किल्ल्यांतून बाहेर पडलेले पाहून हबशी


सावध झालेले होते. त्यामुळें लढाई मोठी निकराची झाली. कान्होजीच्या अंगांत त्यावेळीं वीरश्रीचा विलक्षण संचार झालेला होता. तो एकदम शत्रुसैन्यांत घुसला. आपले लोक आपल्या मागून येत आहेत कीं नाहींत हें पहाण्याचें त्याला भानच राहिलें नाहीं ! तो कापाकापी करीत बराच पुढें गेला आणि त्याचे लोक मागें राहिले. पुढारी दिसेनासा झाल्यामुळें ते लोक घाबरले आणि मागें पाय घेऊन आल्या वाटेनें परत किल्ल्यांत गेले नि किल्ल्याचा दरवाजा बंद करून बसले ! यापुढें किल्ल्यांत राहूनच शक्य तितके दिवस किल्ला लढवावयाचा असा त्यांचा विचार ठरला.

इकडे शत्रुसैन्यांत कान्होजी एकटाच झुंजत होता? हबशांच्या सरदारानें त्याला सांगितलें कीं "तुझे सर्व सोबती पळून गेले ! तूं निमूटपणें हत्यार खालीं ठेऊन आमच्या स्वाधीन होत असलास तर तुझ्या जिवाला आम्हीं कांहींएक अपाय करणार नाहीं. नाहींतरी तूं आतां आमच्या तावडींत सांपडलाच आहेस ! तेव्हां पहा आपला काय तो विचार."

कान्होजीनें एकवार मागें पाहिलें. वीरश्रीच्या भरांत आपल्या हातून घडलेली चूक त्याला कळून आली. आतां अधिक लढत राहण्यांत शहाणपणा नाहीं असा त्यानें विचार केला व तो शत्रूच्या स्वाधीन झाला.

किल्ल्यांत घडलेल्या क्रांतीची बातमी हबशी सरदाराला नव्हती. त्यामुळें मराठ्यांनीं आपणांवर केलेला हल्ला म्हणजे मोहित्यांनीं केलेला विश्वासघात असें तो समजला ! त्याच्या या गैरसमजुतीचा फायदा कान्होजीला मिळाला. मोहित्यांच्या हुकुमाचा ताबेदार इतकेंच महत्त्व हबशी सरदारानें कान्होजीला दिलें. तथापि त्याला किनाऱ्यावर न ठेवतां त्याची रवानगी त्यानें एका आरमारी जहाजावर करून दिली.

जहाजावरील लोकांनीं कान्होजीचे हातपाय बांधून त्याला जहाजाच्या अगदीं एकीकडच्या बाजूला नेऊन ठेविलें. जहाजावरून तो निसटून जाईल असें त्यांना वाटलेंच नाहीं. त्यामुळें त्याच्यावर नजर ठेवण्याची दक्षताहि त्यांनीं घेतली !




रात्र पडून जहाजावरील लोकांची निजानीज झाली. फक्त टेहळ्या तेवढाच काय तो आपल्या जागेवर बसून होता. पण तो देखील डुलक्या खात होता !

सर्वत्र सामसूम झालेलें पाहून कान्होजी आपल्या सुटकेच्या उद्योगाला लागला. तो चांगला बळकट होता. त्यामुळें हातापायांना बांधलेल्या दोऱ्यांची त्याला पर्वा वाटली नाहीं. युक्तिप्रयुक्तीनें प्रथम त्यानें आपले हात मोकळे केले. नंतर पायांच्या दोऱ्या सोडल्या. मग त्या दोऱ्यांना गांठी देऊन त्या त्यानें

जहाजाच्या बाहेरल्या बाजूला बांधल्या आणि त्यांच्या गांठीवर पाय देत देत त्यावरून तो हळूच समुद्रांत उतरला. त्यानें उडी टाकली असती तर आवाज होऊन टेहळ्याचें लक्ष्य कदाचित् त्या आवाजाकडे वेधलें असतें. परंतु तो दोरीवरून हलकेच उतरल्यामुळें टेहळ्याचें डुलक्या खाणें चालूच राहिलें ! कान्होजी समुद्रांत उतरल्यावर पोहत पोहत सुवर्णदुर्गाच्या रोखानें चालला. सुवर्णदुर्ग तेथून कोस दीड कोस अंतरावर होता. तरी त्याचें त्याला कांहींच वाटलें नाहीं. एखादा मासा आपणाला चट्कन ओढून समुद्राच्या तळाशीं नेईल अशी भीति देखील त्याच्या मनाला वाटली नाहीं ! पोहत पोहत तो पहांटेच्या सुमारास सुवर्ण-दुर्गाच्या दरवाजापाशीं जाऊन पोंचला; आणि दरवाजा-वरील पहारेकऱ्यांना आपली ओळख पटवून किल्ल्यांत गेला. दुसऱ्या दिवसापासून त्यानें हबशांच्या आरमारावर किल्ल्यांतून जोराचा मारा चालू केला नि जमीनीवरील हबशी लष्करावर वेळोवेळीं छापे घालून त्याला त्यानें जेरीस आणलें. तेव्हां आपलें कांहीं चालत नाहीं असें

पाहून हबशांनीं कान्होजी बरोबर दोस्तीचा तह केला आणिं ते वेढा उठवून चालते झाले.

कान्होजी संकपाळ हा मराठ्यांच्या इतिहासांत ' कान्होजी आंग्रे ' या नांवानें विख्यात आहे.


संकपाळ हे मूळचे आंगरवाडी नामक ठिकाणचे. म्हणून त्या ठिकाणावरून त्यांना आंग्रे हें नांव प्राप्त झालें आणि त्याच नांवानें ते प्रसिद्धीला आले.

वर दिलेला प्रसंग घडला त्याच सुमारास छत्रपति संभाजी महाराजांना औरंगजेब बादशहानें पकडून त्यांचा वध केला. संभाजी महाराजांनंतर राज्यावर आलेले छत्रपति राजाराम महाराज यांनीं कान्होजी आंग्र्याची कर्तबगारी आणि कर्तव्यनिष्ठा पाहून मराठी आरमाराचा संपूर्ण अधिकार त्याजकडे सोंपविला आणि त्याला ' सरखेल ' असा किताब दिला.

मराठ्यांच्या इतिहासांतील कर्तबगार घराण्याच्या यादींत आंग्रे घराण्याचें नांव येतें. पेशव्यांचे जसे जमिनीवरील पराक्रम, तसे आंग्र्यांचे समुद्रावरील पराक्रम चिरस्मरणीय आहेत. कान्होजी आंग्रे या

पुरुषाची गणना तर मराठ्यांच्या इतिहासांतील अव्वल दर्जाच्या व्यक्तींतच केली पाहिजे.

कान्होजी आंग्रे याचा शिक्काः—




म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २५२८ नों. दि
वि. ८१०९१



IRBK-0102528

